**नि.क्र. १५०**

**<u>आरंभ</u>**

**<u>वादीतर्फे सा.क्र.२ श्रीमती पुजादेवी संतोष चव्हान यांचा शपथेवर सरतपास वादीतर्फे ॲड. एम. सी. खंगारे</u>**

०३. मी माझे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केलेले असून त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर लिहिलेला आहे. त्यावर माझी सही आहे. मी माझे कथनाचे पृष्ठ्यार्थ इंडेक्स २ ची प्रत दाखल केलेली आहे. त्या प्रतला नि.क्र.१५३ देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास ॲड. श्री. एम.एम.पांडे प्रतिवादीतर्फे</u>**

०४. माझे शिक्षण ८ वी पर्यंत झालेले आहे. मी कोणताही कामधंदा करीत नाही. मागील १८ वर्षापासून मी चनकापूर येथे राहते. मी शेत क्र. १६५ व १८४ चे दस्तऐवज पाहिलेले आहे. शेत क्र. १६५ व १८४ ची आराजी किती आहे हे मला माहित नाही. पूर्वी हंसराजचे कोणत्या वाडवडीलांचे नावे ही शेती होती हे मला माहित नाही. मला ह्या शेतांच्या चतुर्सिमा माहित नाही. मी माझ्या प्लॉटचे खरेदी खत अभिलेखावर का दाखल केले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या प्लॉटच्या खरेदीमध्ये शेत सर्वे क्र. १६५ व १८४ लिहिलेले

नाही. हे म्हणणे खरे आहे की, चनकापूर शिवारामध्ये हजारो एकर जमीन आहे.

०५. हंसराजने सदरहू शेती अकृषक करण्याकरीता कधी अर्ज केला होता हे मला माहित नाही. तसेच, कोणत्या इंजिनिअरकडून प्लॉटचा नकाशा तयार केला हे मला माहित नाही. तसेच, टाउन प्लॅनिंग रजिस्ट्रारची कधी परवानगी मिळाली ते ही मला माहित नाही. आम्ही सहा प्लॉट घेतलेले आहे परंतु त्या सहा प्लॉटचा वेगळा सातबारा उतारा झाला किंवा नाही हे मला माहित नाही. ह्या प्लॉटवर नॉन अग्रिकल्चर कर किती आहे हे मला माहित नाही. मला ह्या प्लॉटची सनद मिळाली नाही. सदरहू प्लॉट हा पतीने माझे नावावर केला त्यावेळी मी फक्त खरेदी खतावर सही केली हयाशिवाय मला त्या प्लॉटचे व शेतीचे काहीही माहित नाही. मला ह्या केसमध्ये प्रतिवादी कोण आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, ह्या शेतांचा व माझ्या प्लॉटचा काहीही संबंध नाही. सदरचा प्लॉट माझे नावावर नोंदविण्याकरीता ग्राम पंचायतला कधी अर्ज दिला होता व तो प्लॉट माझे नावावर कधी झाला हे मला माहित नाही. सदरहू घराची टॅक्स पावती माझेकडे नाही. साक्षीदार स्वत:हून सांगते की, ते माझे पतीकडे आहे. सदरहू प्लॉटवर बांधकाम करण्याकरीता ग्राम पंचायतला कधी अर्ज केला होता व त्यांनी कधी मंजुरी दिली हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पतीने मला साक्ष करता न्यायालयात पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, मी माझा प्रतिज्ञापत्राचा लेख न वाचता त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही

की, माझ्या पतीच्या व प्रतिवादी क्र.१ हंसराजच्या सांगण्यावरून मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

सावनेर–
दिनांक – ०७.०४.२०२५

समक्ष
श्रवणोत्तर स्वीकृत

SANJEEV AKARAM SARDAR
Digitally signed by SANJEEV AKARAM SARDAR
Date: 2025.04.07 17:36:35 +0530

(एस. ए. सरदार)
दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सावनेर
तालुका सावनेर, जिल्हा – नागपूर